# आगराळ

चंद्रकुमार नलगे

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B119

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**आगराळ : चंद्रकुमार नलगे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १९०/-

एक नेक, प्रामाणिक
अन्यायाविरुद्ध करारीपणे आवाज उठविणारे,
अभिजात ग्रंथाचे वाचन करण्याचे वेड असलेले
श्री. संपत पांडुरंग आबदार
सहाय्यक अभियंता (वर्ग दोन)
यांना श्रद्धापूर्वक अर्पण

# अनुक्रमणिका

१. नदऱ्या ........ ७
२. आणखी एक जटायू ........ १९
३. वाघोर घोल........ ३०
४. भुईकंप........ ४१
५. आगराळ........ ५७
६. डोळे वादळाचे !........ ६९
७. जायबंदी........ ८०
८. गुहा आणि मनू ........ ९४
९. पाठलाग........ १०८
१०. कोणी एक दाजीबाबा........ १२४
११. हिरवळ........ १३३
१२. लाल डोळ्याचा माणूस........ १४६
१३. बाताड्या........ १६२
१४. पालट........ १७०
१५. कळा अंतरीच्या........ १८०

✦✦✦

# नदऱ्या

'पळा रं ऽऽ. गेला बग... सीताफळीच्या जाळीत... आरं गंग्या... सोड... सोड... कुत्रं सोड... वरच्या टोकाला आला बग... रामज्या ऽऽ आडवा हो... वरनं... वरनं... लपलाय बगा तिथं... आरं लक्षा जाळ्या ओढा... दंगा उठवा... आरं उठला बगा... पळसटेकीकडं... सोडा... सोडा कुत्री... सोडू नका... कोंडा... चहुअंगानं हाके घाला... भिडा... दोन म्हैनं चकावण्या दाखवतोय बघ... आज शेवटच त्येचा... सोडू नका... ये शिरप्या... हसतोस काय लेका... तट अडीव... ही हसायची येळ हाय का... आलो म्हणजी थोबाड फोडीन बघ... असं होतं तर खज्याळीच्या शिकारीला यायचं हुतंस कशाला... आरं आला बग... शिरप्या... शिरप्या... तुझ्या पुढल्या बोराटीच्या जाळीत... लपलाय बग... घाल... घाल... घाल... थोपाटी... आरं घावला का... घावला ! ... शिरप्या... वारं भाद्दरा... असा गडी पायजे... कुत्री धरा... नाहीतर पळवतील ससा... आधी कुत्री धरा...'

या आवाजानं सारा डोंगरदरा हादरून जाई. जाळ्याजुळ्या थरारून जात. वरच्या आभाळाच्या घुमटात हा दंगा घुमत राही. साऱ्या शिवारभर प्रतिध्वनी

उमटत. नदीच्या ऐलपैलाच्या पट्ट्यातील माणसं या दऱ्यातल्या दंग्याकडं काम सोडून बघत राहत... शिवाराशिवारातली, शेताभाततली, नदीथडीतली माणसं तिथनंच मोठ्यानं ओरडत... 'आरं नंदऱ्या... धुळ्या सांग... सांग... गेला बगा... पळाला बघा... जाळ्यात... नागझरीच्या बाजूनं पळाला बघा... धबधब्याच्या कड्यावर लपलाय रंऽऽ'

त्या डोंगरच्या शिकारीत आपणही सामील असल्यागत माणसं जागच्या जागी नाचत... ओरडत... पळत्या सशाचा माग सांगीत... सगळा मुलुख या दंग्यानं गदगदून जाई... सगळ्यांच्या नजरेपुढं डोंगराचं धावतं चित्रं उभं राहिलेलं. घडत राहिलेलं... हाके... धावती कुत्री... शिकाऱ्या पोरांचा दंगा... पळापळ... सशाच्या हुलकावण्या... पार नदीच्या तळतळवटापासून ते डोंगराच्या नजर न पोचणाऱ्या अस्वलटेकीपर्यंत. अन सगळ्या मुलखाच्या नजरेत भरत राही. ते उभं आभाळ पाठीवर घेऊन नी पाय तळाच्या नागझरीत सोडलेल्या प्रचंड कपारीवर उभा असलेला टेहळण्या... धुळ्या. त्याच्या इशाऱ्यावरच डोंगर-दऱ्यातील शिकार चाले. त्याची नदार शाबूत तर शिकार शाबूत. नाहीतर सगळ्यांचाच ताबूत. हा नदऱ्या पक्का लागतो. हेरक्या लागतो. तोच शिकारीचा खरा म्होरक्या ठरतो.

दहा गावात धुळ्याचं नाव झालेलं. नदऱ्या म्हणूनच जणू धुळा जन्माला आलेला. तो नदऱ्या म्हणून असला की, एखादा ससा सहज काठीला अडकवून न्यावा. शिकार झालीच म्हणून समजावं.

धबधब्याच्या उंच पहाडी कपारीवर धुळा उभा राहिला की, अवघा दरा त्याच्या नजरेच्या टप्प्यात येई. दऱ्यावर उंच फिरणारी घारसुद्धा धुळ्याच्या कितीतरी खाली तरंगताना दिसे, तरीही धुळाची नजर पल्ल्यावरच्या जाळवंडातील एवढासा सरडाही हेरी. अत्यंत तीक्ष्ण. धारदार... लखलखती नजर. कुठल्या खिळ्यात घोरपड सरकली नी कुठल्या कपारीत खोकड घुसलं हे बरोबर सांगी...

दऱ्यातल्या दाट सागवानाचं झाड न् झाड त्याच्या नजरेच्या पक्क्या ओळखीचं, कुठल्या सागाच्या शेंड्यावरल्या कोटयात कवड्यानं अंडी घातलीत, ती इतक्या दुरावरनंही सांगे.



एकदा कपरीवर उभं असताना एक साळींदर साव्याच्या पिकात चरताना दिसलं, तर ह्यानं काटेरी जाळ्यातनं उड्या टाकीत साळीचं रान गाठलं. साळींदरचा पाठलाग केला. साळींदर आपली टोकदार पंखं बाण सोडावेत तसे सोडत होतं. ती बाणासारखी त्याला भिडत होती. धुळा रक्तबंबाळ झाला; पण त्यानं साळींदराचा ताणपट्टा काढला. बिळातून ओढून काढून काखेत आवळून मारलं. रक्ताला डगमगला नाही की सुळ्यांना भ्यायला नाही. असा बेडर धुळा. दगडीपाला अंगभर लावला की झाला मोकळा, साऱ्या रक्तखुणा अंगभर मिरवत राही.

त्या धबधब्याच्या उंच पहाडी कपारीवर नुसतं उभं राहणं हे तर भोवळ आणणारं. खाली खोल उभी कपार. मध्येच कोसळणारा धबधबा. त्याचा दराभर घुमणारा आवाज. कपारीचा नुसताच सुळका पुढं झुकलेला. आजूबाजूला ना आधार. एक-दोन माणसं अंग आवरून उभी राहतील एवढीच तिथं जागा. भोवळ आली तर सरळ अस्मानांतून खाली गरगरत आल्यासारखंच. तिथं जाण्याचं धाडस बिनकाळजाच्या माणसानंच करावं; पण धुळा तिथं बिनधास्त शिकारीचा सज्जा उभा करी. हाके घालणाऱ्यांना इशारे देत राही. कुत्रंवाल्यांना फऱ्या-फऱ्यानं उभं राहायला सूचना देई. ससा उठला की, धुळाची कसरत बघावी. ससा कुठून कुठं, कसा गेला ते तो ओरडून सांगे. कुणी कसा पवित्रा घ्यायचा ते चटकन बोले. फटाक्याची माळ फरफर पेटत राहावी तशा त्याच्या सूचना. त्यांना हुशार शिकारीच टिकत.

ससा कसाही लपला, पळाला, चकवा करू लागला तर धुळाची नजर त्याच्यावरच असे. पापणी न पडू देता रोखलेली. खंड्या पक्षासारखी नेमकी त्याच्यावरच जणू धुळाची नजर तरंगत असलेली.

एखादा शिकारी पोर अगर थोराड बापय गाफील राहिला, त्याला पुढ्यात आलेल्या सशानं हुलकावणी दिली, तर धुळाची आकाश फोडून आलेली शिवी ऐकावी. वीज कडकडून भुई दुभंगून जावी अशासारखी ती असे. गोळीबंद... बरकंद...

त्याचा आवाज तर टिपीचाच. तोंडातनं आला तसा ऐकावा. आभाळाच्या नितळ निळाईसारखा. खर नसलेला. भरडाही नसलेला. सुईऽऽ करून जाणारा.